Historicity Research Journal
Volume 1 | Issue 12 | Aug 2015 ISSN:- 2393-8900

**Research Article**

# एकोणिसाव्या शतकातील भारतीय स्त्रीजीवनाची वाटचाल एक चिंतन

**बाबासाहेब केशवराव शेप**

इतिहास विभाग प्रमुख, वैद्यनाथ कॉलेज, परळी वै. जि. बीड .

**प्रस्तावना :**

भारतीय समाजव्यवस्थेत कुटुंब व समाजजीवन या घटकात स्त्रीला महत्त्वाचे स्थान आहे. तीची भूमिका महत्त्वाची असते. परंतु ही स्थिती येण्याकरिता स्त्रीला प्राचीन काळापासून संघर्ष करावा लागला होता. कारण पूर्वी तिला मर्यादित स्वातंत्र्य होते. आर्थिक, शैक्षणिक, सामाजिक स्वातंत्र्यापासून ती वंचीत होती. पितृसत्ताक कुटुंब पद्धती आसल्या करणाने मुलाचा जन्म महत्त्वाचा मानला जाई. मुलगी जन्माली की दु:खाचे कारण ती बनत असे. कुटुंबव्यवस्थेत स्त्रियांवर विविध नियम लादले जाई. पतीच्या निधनानंतर तिला पुर्नविवाह करता येत नव्हता. एकंदरीत प्राचीन काळात स्त्रीयांची स्थिती अत्यंत हालाखीची हीती. मध्ययुगातील समाजात स्त्रीयांमध्ये अंधश्रध्दा, अज्ञान यांचा प्रभाव होता. बालविवाह, हुंडा पध्दत, असल्या कारणाने समाजात तिची कुचंबना होत असून हिंदू समाजा प्रमाणे मुस्लीम स्त्रीयांना देखील दुय्यम स्थान देण्यात आले होते. अशी परिस्थीती असताना देखील सुलतान रझीया, गुलबदम बेगम, नुरजहाँ, संत मिराबाई, मुक्ताबाई, जनाबाई, यांनी इतिहासाला मोठे योगदान दिले आहे.

आधुनिक काळात ब्रिटीश सत्तेचा प्रभाव भारतीय समाजावर पडला तरी साविञीबाई फुले, पंडीता रमाबाई, रमाबाई रानडे, ताराबाई शिंदे या स्त्रीयांनी स्त्री प्रश्नांच्या संदर्भात आवाज उठविला व स्त्रीयांच्या जीवनात जन जागृती घडून आणली. त्याच बरोबर भारतीय स्वातंत्र लढयात झाशीची राणी लक्ष्मीबाई, कमला नेहरु, अरुणा असफअली, या स्त्रीयांनी मोठे योगदान दिले आहे हे नाकारता येणार नाही. तरी पण एकोणिसाव्या शतकातील भारतीय स्त्री जीवनाची स्थीती कशी होती यावर प्रकाश टाकणे क्रम प्राप्त ठरते.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

1) एकोणिसाव्या शतकातील भारतीय स्त्री जीवनाचा अभ्यास करणे.
2) स्त्री विषयक परिर्वतन घडवून आणणा-या समाज सुधारकांच्या कार्याची माहिती घेणे.
3) एकोणिसाव्या शतकातील भारतीय स्त्री चळवळीचा ऐतिहासीक दृष्टीकोनातून अभ्यास करणे.

**गृहितके :**

1) एकोणिसाव्या शतकातील भारतीय स्त्रीजीवनाचा अभ्यास महत्वपूर्ण आहे.
2) स्त्री विषयक परिर्वतन घडविणा-या भारतीय समाज सुधारकांची भूमिका महत्वपूर्ण आहे.
3) एकोणिसाव्या शतकातील भारतीय स्त्री चळवळीचा अभ्यास ऐतिहासीक दृष्ट्या प्रेरणादायी आहे.

**संशोधन पध्दती :**

प्रस्तुत संशोधनाकरिता वर्णनात्मक, विश्लेषणात्मक व संदर्भान्वयी या संशोधन पध्दतीचा आधार घेतलेला आहे.

**एकोणिसाव्या शतकातील भारतीय स्त्रीजीवनाची वाटचाल :**

भारतात ब्रिटीशांची सत्ता प्रस्थापीत झाल्यानंतर त्यांनी ज्या सुधारणा केल्या त्यांचा प्रभाव भारतीय समाज जिवनावर दिसून येतो. याच काळात वैचारिक प्रगती घडुन आली. कारण पूर्वी समाजात असलेल्या अनिष्ठ रुढी परंपरा, अन्याय अत्याचारी मिळणारी वागणूक याचाही परिणाम भारतीय समाजावार झाला एकंदरीत पाश्चात्य संस्कृतीचा प्रभाव वृध्दीगत होत गेलेला आहे. आज तर शिक्षण पध्दतीचा विस्तार मोठया प्रमाणात झाल्यामुळे प्रत्येक क्षेत्रात स्त्री ही अग्रेसर झालेली दिसते या पाठीमागे पाश्चात्य विचार, नवी शिक्षण पध्दती, वृत्तपत्रे, समाज सुधारकांनी स्त्री प्रश्न सोडविण्यासाठी घेतलेली भूमिका महत्वपूर्ण ठरली आहे. यातूनच स्त्री जिवनाविषयाचा विचार उत्तरोत्तर काळात वाढीस आला. पाश्चात्य संस्कृतीच्या प्रभावामुळे स्त्रीयांकडे पहाण्याचा दृष्टीकोन बदलत गेला आहे. याकरिता राजा राममोहन रॉय, ईश्वरचंद्र विद्यासागर, बाळशास्त्री जांभेकर, लोकहितवादी, इत्यादी समाजसुधारकांची ही भूमिका स्त्रियांमध्ये परिर्वतन घडवून आणण्यासाठी महत्वपुर्ण ठरली.

**1) पाश्चात्य संस्कृतीचा प्रभाव :**

ब्रिटीशापूर्वी भारतात अनिष्ठ रुढी परंपरा, जातिव्यवस्था, कुटुंबसंख्या, विवाहपध्दती इ. क्षेत्रात मोठया प्रमाणात बंधने होती. विवाह संबंध हा आपापल्या जातीपुरता मर्यादित होता, इतर जातीत विवाह करता येत नव्हते. समाजातील ही बंधने पाळली की नाही हे पाहण्या करिता 'गोतसभा' होती. त्यांचे निर्णय मान्यच करावे लागत असत, न मानणा-या व्यक्तीला वाळीत टाकले जाईल. समाजात एकत्र कुटुंबपध्दती असल्या कारणाने कुंटुंब प्रमुखांची भूमिका महत्वाची होती. कुटुंब प्रमुखाला कुटुंबातील विविध समस्या सोडविण्याचे कार्य करावे लागत असे. त्याच बरोबर कुटुंब प्रमुखाची अज्ञापालन हा कुटुंब व्यवस्थेचा प्रमुख पाया होता. सतीप्रथा, बालविवाह पध्दती, जरठ बालविवाह प्रथा, विधवांचे प्रश्न, कुटुंबातील स्त्रीयांना दुय्यम स्थान इत्यादी बाबी समाजात होत्या यामुळे स्त्रीयांची स्थीती शोचनीय बनली होती. कारण शिक्षणाचा आभाव असल्यामुळे स्त्रिया शिक्षणापासून वंचित राहील्या होत्या अशा स्थितीत त्यांच्यात परिर्वतन होणे ही एक काळाची गरज बनली होती. परंतु ब्रिटीश सत्तेच्या स्थापनेनंतर त्याबाबतीत परिर्वतन घडवून आले व वैचारिक जागृती निर्माण झाली.

**2) वैचारिक जागृतीचा प्रभाव :**

ब्रिटीशांमुळे आपल्याला पाश्चात्य ज्ञानाची ओळख झाली, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. त्यापूर्वी भारतीय समाज हा धर्माधिष्ठीत होता. ब्रिटीशांनी या समाजाला वैचारिक प्रवाहात आणण्याचे कार्य केले ब्रिटीशांच्या काळात धर्माचा प्रसार करणे, प्रशासनव्यवस्थेत भारतीयांचा सहभाग घेणे, पाश्चात्य संस्कृतीचा प्रसार करणे, नौकरी, व्यवसाय, इत्यादी मुळे भारतीय समाज पाश्चात्यांकडे आकर्षित झाला. स्त्रीयांना देखील शिक्षणाच्या संधी उपलब्ध झाल्या भारतीय समाजातील असलेले दोष दूर करण्यासाठी पाश्चात्याचा प्रभाव महत्वपुर्ण ठरला. समाजात असणा-या सतीप्रथा, नरबळी, बहुपत्नीत्व पध्दत, केशवपन, विधवांचे प्रश्न इत्यादी प्रथा नष्ट करण्यासाठी पाश्चात्य संस्कृतीचा विचार वाढीस आला. शिक्षणाच्या माध्यमातून सामाजिक प्रबोधनाला दिशा प्राप्त झाली. अशा प्रकारे वैचारिक जागृतीमुळे एक डोळस दृष्टीकोण निर्माण झाला त्यातूनच एक नवी विचारधारा उदयास आली.

**3) वृत्तपत्राची भूमिका :**

वृत्तपत्र हे मानवी मनाचा आरसा असतात, असे म्हटले जाते. ज्याप्रमाणे आंधा-यात्री प्रकाश देण्याचे काम दिवाबत्तीचे असते, त्याप्रमाणे समाज प्रबोधनाचे काम वृत्तपत्राचे असते. वृत्तपत्रे, साप्ताहिक, मासिके, नियतकालिके यामुळे वैचरिक जागृती निर्माण झाली व नविन विचारधारा उदयास आली. अशिक्षीत वर्गात असणारे दोष दूर करण्याचे काम वृत्तपत्रांनी केले तसेच बाहय जगाचे स्वरुप भारतीय समाजाला माहित झाल्यामुळे भारतात आधुनिकीकरणाची सुरुवात झाली. सामाजिक व धार्मिक सुधारणाचे एक नवे पर्व सुरु झाले व पारंपारीक शिक्षणात परिर्वतन घडुन आले. ब्राम्हण वर्गाची मक्तेदारी, धर्माचे प्राबल्य, पारशी, आरबी, संस्कृत भाषेचा प्रभाव, पोथीनिष्ठ ऐवजी धर्मनिरपेक्ष, बुध्दीनिष्ठ, निसर्गविज्ञानाचा अभ्यास सुरु झाला.

**4) शिक्षणाचा प्रसार :**

भारतात पाश्चात्य शिक्षणाची सुरुवात लॉर्ड मेकॉलेच्या काळात इ.स. 1835 मध्ये झाली. त्यामुळे भारतीयांना एक नवे दालन उघडून दिले पाश्चात्य संस्कृतीची ओळख भारतीयांना झाल्यामुळे नविन विचार वाढीस लागले. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात सामाजिक व धार्मिक प्रबोधन काळात स्त्री शिक्षणावर विषेश भर देण्यात आला. भारतीय समाजातील स्त्रीयांचा दर्जा उंचाविण्यासाठी

मोठया प्रमाणात प्रर्यत्न झाले. स्त्री यांबाबत असलेल्या अनिष्ठ रुढी परंपरा, निरक्षरता याबाबी दूर करण्यासाठी या काळात महत्वपूर्ण भूमिका घेण्यात आली. पाश्चात्य विचार, शिक्षणाच्या प्रसारामुळे समाज प्रबोधनाची सुरुवात झाली.

5) **समाज सुधारकांचे प्रयत्न :**

भारतात ब्रिटीशांची सत्ता प्रस्थापित झाल्यामुळे पाश्चात्य शिक्षणाची सुरुवात झाली त्यातून भारतीयांना पाश्चात्य ज्ञानाची ओळख झाली. व्यक्ती स्वातंत्र, समता, बंधुत्व इत्यादी विचारांचा प्रभावातून सुधारणा वादी विचार वाढीस लागले. भारतातील समाज सुधारकांनी विविध घटाकांवर वाचा होणा-या अन्यायाची वाच्या फोडण्याचे कार्य केले स्त्रीयांवरील अन्याय अत्याचार दूर करुन समता प्रस्थापित करण्यासाठी महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर लोकहितवादी, सावित्रीबाई फुले, न्यायमुर्ती रानडे इत्यादींची विचारधारा महत्वपुर्ण ठरली त्यांच्या विचारातुन भारतीय स्त्री शतकानुशतके दुर्लक्षीत होती. तीच्यावरील अन्याय अत्याच्या दुर करण्यासाठी बंगालच नव्हेतर सर्व प्रांतात सुधारणा सुरु झाल्या ज्याप्रामाणे सतीबंदी चळवळीमुळे वाढ होत गेली इ.स. 1810 मध्ये ख्रिश्चन मिशन-यांनी मुलींसाठी पहिली शाळा सुरु केली. स्त्रीयांच्या शिक्षणावरील भारतीय भाषेतील (बंगाली) पहिले पुस्तक कोलकत्याच्या फिमेल ज्युवेनाईल सोसायटिने इ. स. 1819 मध्ये प्रकाशीत केले स्त्रीयांच्या शिक्षणासाठी बंगालमध्ये आत्मीय सभेने कार्य केले, आत्मीय सभेची स्थापना इ.स. 1815 मध्ये राजा राममोहन रॉय यांनी केली होती. याच वर्षी त्यांनी सतीप्रथे विरुध्द पहिला ग्रंथ लिहिला.

ईश्वरचंद विद्यासागर यांनी विधवा पुर्नविवाहचा कायदा इ.स. 1856 मध्ये संमत केला त्यामुळे विधवा स्त्रीयांचे शोषण थांबले त्यांनाही संपतीचा हक्क मिळावा यासाठी पर्यत्न सुरु झाले. आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांनी विधवा विवाह, स्त्री शिक्षण यांना प्राधान्य देऊन आपल्या दर्पण या वृत्तपत्रातुन जन जागृती घडुन आणली जांभेकर हे स्त्री शिक्षणाचे पहिले पुरस्कृर्ते होते. बालविवाह प्रथा नष्ट करणे, विधवा विवाह या सामाजीक सुधारणा विषयी जाभेकरांनी प्रथम लिखान केले.लोकहीतवादींनी पुर्नविवाहोतेजक मंडळाची स्थापना करुन जाती व्यवस्थेवर प्रखर टिका केली. महात्मा फुले यांनी आधुनिक काळातील स्त्रीयांचे प्रश्न सोडविण्यासाठी शिक्षणाना प्राधान्य दिले. त्यासाठी महाराष्ट्रात इ.स. 1848 मध्ये पहिली मुलींची शाळा पुण्यात सुरु केली. तसेच अस्पृश्य स्त्री समाजाला शिक्षण मिळाले पाहिजे यासाठी फुले दामपत्यांनी महत्वाची भूमिका घेतली.

**समारोप :**

वरील सर्व विवेचनावरुन स्त्रीयांच्या स्थितीचा आढावा घेता येतो की, भारतीय समाजातील स्त्री पुर्वी पासून अनेक बंधनात दडलेली होती, तिला बाहेर आणण्याचे कार्य 19 व्या शतकातील समाज सुधारकांनी केले त्यामुळे आजच्या काळात स्त्रीयांमध्ये मोठया प्रमाणात बदल घडून आले आहेत, तिचा दर्जा उंचावलेला आहे. त्याचे सर्व श्रेया महात्मा फुले यांना जाते. कारण त्यांनी असा संदेश दिला आहे की, जो पर्यत स्त्री शिक्षीत होणार नाही तोपर्यंत तिचा उध्दार होणार नाही, त्यामुळे स्त्रीयांना सुधारणेच्या प्रवाहात आणण्याचे कार्य त्यांनी केले आहे. पुढे डॉ. बाबासाहेब अंबेडकरांनी स्त्रीयांच्या उन्नतीसाठी ही चळवळ सुरु केली. त्यामुळे स्त्री शिक्षणात वाढ झाली आहे. आज प्रत्येक क्षेत्रात स्त्री आग्रेसर बनलेली दिसते.

**संदर्भ :**

1) सुलभा धारुरकर - हैद्राबाद मुक्ती लढा व महिलांचे योगदान
2) खिवसरा मंगला - स्त्रीमुक्ती चळवळ आणि वृत्तपत्राचा संदर्भ, स्वरुप प्रकाशन, औरंगाबाद 2005
3) गव्हाणे शुभांगी (संपा.) - स्त्री परिर्वतनाची अव्हाने, साऊथ ऐशियन, रिसर्च पब्लीकेशन, औरंगाबाद 2003
4) रानडे प्रतीभा - स्त्री प्रश्नाची चर्चा एकेविसावे शतक, पॉप्युलर पब्लीकेशन, मुंबई 1992
5) भागवत कमल - स्त्री शिक्षणाची वाटचाल प्रतीभा, प्रकाशन, पुणे 2004
6) डॉ. पाटील लिला - भारतीय स्त्री जिवन, मेहता पब्लीकेशन, पुणे 1990
7) डॉ. पद्माजा पाटील - भारतीय इतिहासातील स्त्रीया, फडके प्रकाशन, कोल्हापुर 2011
8) डॉ. गाठाळ एस.एस. - भारतीय इतिहासातील स्त्रीया व स्त्री जीवन, कैलास पब्लीकेशन, औरंगाबाद 2014
9) डॉ. अनिल कठारे - अधुनिक महाराष्ट्राचा इतिहास, विद्या प्रकाशन, औरंगाबाद